
बागुलबोवा
विंदा करंदीकर

BAGULBOWA
(Poetry for children)
Vinda Karandikar

बागुलबोवा
(म-८०२)
पॉप्युलर प्रकाशन
ISBN 81-7185-637-3

© विंदा करंदीकर

पहिली आवृत्ती : १९९३/१९९५

चित्रे व सजावट : अनिल दाभाडे

प्रकाशक :
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३५ सी, पं. मालवीय मार्ग,
ताडदेव मुंबई-४०० ०३४

मुद्रक
राम प्रिंटोग्राफ
३०, शास्त्री पार्क, कृष्णनगर
दिल्ली ११० ०५१.

या कविता यापूर्वी विंदा करंदीकर यांच्या
'स्वेदगंगा' या काव्यसंग्रहात प्रसिद्ध झाल्या आहेत.

**किंमत : रु. १५.००**



# बागुलबोवा

## विंदा करंदीकर





# माझें घड्याळ



घड्याळ माझें नवें असे;
सुंदर दिसतें पहा कसें!
दादाचें तर जुनें मुळीं;
झुरळांची वाटे खोली!
घड्याळ माझें लखलखतें;
सांग कोणचें आवडतें?

'उगाच वटवट बोलुं नये;
कटकट कोणा करूं नये'
—तूंच नाहिं का म्हणत असें?
किटकिट त्याची सदा असे.
दिवसां किटकिट,
रात्रीं किटकिट,
घड्याळ माझें गुणी मुळीं
कटकट कधिं ना करी खुळी!

गडबड करितां मार मिळे,
हेंहि न त्याला कसें कळे?
रात्रीं निजण्याच्या वेळीं
दादा त्याचा कान पिळी;
कुरकुरतें, परि ना खळतें,
रागानें चिडुनी जातें;
झोंप लागते दादाला,
तें नच खपतें पण त्याला;
पहाट होतां गुरगुरतें,
दादाला जागें करतें.
दादा उठतो;
चिमटा घेतो;
तेव्हां मग तें गप्प बसे;
घड्याळ माझें कधिं न असें!

रात्रीं नशिबीं कोनाडें;
दिवसा करितें पुढेंपुढें.
उगाच बसतें ऐटींत
हालवीत अपुले हात;
लहानमोठे हात तसे
पाहुन येई मला हसें.
लाज तयाला ना त्याची;
खोड कोठची जायाची?
हात असे फिरवुन आधीं
मोडुन घेतें कधींकधीं!
वैद्य आणुनी,
हात जोडुनी,
दादा देतो पुन्हां जरी,
फिरवित बसतें हात तरी!
घड्याळ माझें परी पहा;
चाळा त्याला मुळीं न हा.

घड्याळ दादाचें, आई,
सर्वांना करितें घाई.
खेळ रंगला असे जरी
मधेंच दादा पुरा करी.
गोष्ट न राजाची सरली;
बाबा म्हणती, 'छे, झाली.'
घड्याळ असलें
कुणास सुचलें?
घड्याळ माझें गुणी परी,
किती वाजले पहा तरी!
सकाळचे अवघे सात;
म्हणती खेळा बागेंत.







# जादूगार

आई : मोठा झाल्यानंतर रे
होणार अरु कोण बरें ?

अरु : मी तर होइन जादूगार;
गंमतजंमत मी करणार :
घेइन रंगित पेटारा;
जादूचा मालच न्यारा!
मुंगुस, बेडुक, नाग असे
वळवळ करितिल आंत कसे
जादूचे मंत्रच भारी;
जादूची डमरू-टिपरी.
वाजवीन मी मग पुंगी,
सापांना आणिन गुंगी.
मुगुंस घालुन पोत्यांत,
फुरशीनें मारिन गांठ!
घणसाचा चाबूक बडा
वाजवीन मी तडातडा.
डमडम डमरू
टिपरी टरुरू
मुलींच तुम्ही भिऊं नका;
मंत्रतंत्र हे उगाच कां ?

म्हणाल जादूगार खरा!
असा पाहिला ना दुसरा!
भस्म मंत्रुनी उंच उडे;
पैशाचा पाऊस पडे.
शेजारिल पोरें सारीं
धांवत येतिल सामोरीं;
तीं करतिल गोळा पैसे
आणिक भरतिल सर्व खिसे.
डमडम डमरू
टिपरी टरुरू
चोर घरीं मग पळतिल ते,
रडतिल पाहुन खिसे रिते!

कुरूप नी काळी ताई,
आणिक शिकलेली नाहीं;
पसंत कोणा ना पडते;
खोली लावुन मग रडते.
चिंता परि ना असे मला;
मी तर गे जादूवाला.
डमडम डमरू
टिपरी टरुरू
राजाचा मुलगा दारीं
ताईचा मग शोध करी.
म्हणेन मी, "चल जा, नाहीं
मिळणारच अमुची ताई."
करील मग तो गयावया;
आणिक येइल मला दया.
राजपुत्र हा थोर जरी,
तो नवरा, ताई नवरी.

खरेंच, आई, तुला नवीं
धडकीं लुगडीं दोन हवीं.
कमळीचा परकर सगळा
अगदीं बघ फाटुन गेला;
भाऊला बघ लंगोटी
नकोच का याहुन मोठी ?
बाबांना पंचाबदलीं
हवीं धोतरें लांब भलीं;
डमडम डमरू
टिपरी टरुरू
पडला पुढतीं ढीग पुरा;
काय कमी जादूगारा ?

पाहुनि अमुचा थाट असा
म्हणतिल सारीं : अहो बसा."
"वेळ नसे आम्हास"—परी
म्हणेन मी गोप्यास तरी!



शेजारिल बकुळाकाकी
बोलतील तुजशीं, "या कीं!"
तूंही त्यांना स्पष्ट असें
सांग, "अम्हांला वेळ नसे."
आग्रह झाला जर भलता,
विचार येइल मग करतां!
उरेल ना कांहींच उणें
माझ्या जादूच्याच गुणें?
डमडम डमरू
टिपरी टरुरू
बरण्या आणिक डबे भले
पहा कसे भरुनी गेले!
बरण्यामधुनी तूप असे.
डब्यांत साखर फक्त दिसे.
भाऊ मग ना फीसाठीं
राहिल वर्गाच्या पाठीं.
भाड्याकरितां मग भय्या
देइल ना दारीं ठिय्या!
बाबांना पुन्हां धरूनी
पोलिस ना नेतील कुणी.
आई : नको; नको बोलूं बाळ,
थांब थांब रे लडिवाळ...
अरू : नको कोण तूं म्हणणार!
होइन मी जादूगार.








# बेडकांचे गाणे

डरांव् डुरुक् डरांव् डुरुक्, डरांव् डरांव् डरांव्;
आम्ही मोठे राव; डराव्, डरांव्, डरांव्!

सागर म्हणती उगाच मोठा,
भव्य किती डबक्यांतिल लाटा!
सागर नुसतें नांव; डरांव्, डरांव्, डरांव!

गंगाजळ ना याहुन निर्मळ;
या डबक्यांहुन सर्व अमंगळ;
बेडुक तितुके साव; डरांव्, डरांव्, डरांव!

खोल असे ना याहुन काहीं;
अफाट दुसरें जगांत नाहीं;
हाच सुखाचा गांव; डरांव्, डरांव्, डरांव!

चिखल सभोंतीं अमुच्या सुंदर;
शेवाळ कसें दिसे मनोहर;
स्वर्ग न दुसरा राव; डरांव्, डरांव्, डरांव!

मंत्र आमुचा 'डरांव्' आदी,
'अनंत' आणिक असे 'अनादि',
अर्थ कसा तो लाव; 'डरांव्, डरांव्, डरांव!'



# पंतोजी

खरेंच भाऊ, पंतोजी
पेन्शनींत गेले आजी.

मारकुटे होते फार!
मार न आतां मिळणार!
जाडेंभरडें आखुडसें
धोतर शोभे त्यांस कसें.
डोइस हिरवें पागोटें
अगडबंब, मळकें, मोठें!
शेंडी न परी आंत दडे;
वाऱ्यावरतीं सदा उडे.
कपाळास माऱ्या आठ्या;
पाटीवरच्या रेघोट्या.
गंधाचा त्यावर पट्टा;
त्यांस न रुचते पण थट्टा.
जुनाटसा जोडा खंदी;
अंगरखा बाराबंदी;
पोटापुढतीं खिसा असे,
चंची काळी त्यांत बसे.
तोंडानें चघळीत विडा
धडा शिकवितीं तडातडा.
लाल ओंठ, लालच डोळे
चुका शोधण्या टपलेले.
आणिक दंगा जरा करा,
मिळेल खाऊ पुरा पुरा.
छडीच छम् छम्
घुमेल घम् घम्
हातावर हा खाऊ कधीं
तोंडांत मिळे अधींमधीं!

लहानमोठा भेद नसे
गरीब अथवा धनिक तसे!
मुलांसही खुर्ची देती!
धरा आंगठी वा म्हणती!
रजा कधिंच ना ते घेती;
रोजच वेळेवर येती.
डोळ्यांवर चष्माहि असे,
तरी न कांहीं पुरें दिसे.
हात लावुनी डोळ्यांना
बघती चष्मा आहे ना!
पुस्तक हातीं कधीं नसे;
पुस्तक सारें पाठ असे.
पाठ तसें करवुन घेती;
चुकतां अंगावर येती.



छडीच छम् छम्
घुमेल घम् घम्
मुलें कांपती पाहुन तें;
गोपू तर चड्डीत मुते!



आज परी म्हणतात मुलें
पंतोजी झालेत खुळे!
आज तयांना ज्या वेळीं
पानसुपारी बघ झाली,
त्या वेळीं कोणी त्यांना
म्हटलें, "भाषण करतां ना?"
खुर्चीतुन ते मग उठले;
"बाळांनो!" इतकें वदले.
शब्द न फुटले यापुढतीं;
सर्वांच्या देखत रडती;
आणिक घेउन आम्हांसी
धरूं लागले पोटाशीं;
पंतोजी झालेत खुळे,
हें पाहुन मी दूर पळें;
छडी न छम् छम्
घुमे न घम् घम्
खुळे मारके पंतोजी
पेन्शनींत गेले आजी!



# बागुलबोवा

रात्र पसरते जेव्हां भंवतीं,
समोरच्या त्या अंब्यावरतीं
येउन बसतो बागुलबोवा,
कुणा न कळतो त्याचा कावा!
मी तर या डोळ्यांनीं पाहें
भीषण त्याचें रूप असें हें:

पिकलेली डोक्यावर शेंडी;
—तागाची तकतकती पेंढी!
गरगर फिरती हिरवे डोळे;
—गारेचे चकमकते गोळें!
आणिक खालीं नाक फदाडें;
—पडक्या भिंतींतिल कोनाडें!

जीभ फिरे दांतांतुन पाही;
सुसर जशी खडकांतुन येई.
दांत वाटती दगडच काळे;
कान सुपाच्याहुन मोठाले.

बागुलबोवा पण म्हातारा;
उमर तयाची काय विचारा:
सात कमी वय सात हजारा!
कांहिं न त्याला दुसरें पचतें!
पोर शेंबडे रडवें रुचतें!
घेउन जातो असलीं बाळें
आणिक भरतो अपुले ढोले!
पसरुनि पानें नंतर त्यावर
आपण बसतो त्या पानांवर;
आणिक जेव्हां पिकते आडी,
एक हळू मग खाण्या काढी!

झाड पहा तें पुढचें हाले;
बागुलबोवा तिकडे गेले!







# पतंग

अरु : पतंग मजला आवडतो;
उंच किती वरतीं जातो!
दोरा धरुनी उंच चढे;
क्षणांत मेघाआड दडे.
कबूतरांच्या बरोबरी
दडाकुकीचा खेळ करी.
घेऊन गिरकी,
मारुन फिरकी,
वाऱ्याशीं खेळे कुस्ती,
हवी तशी दंगामस्ती!

सभोंवतीं त्याच्या फेरी
घालतात कां त्या घारी?
खेळगडी तेथें नाना
चिमण्या नी राघू, मैना.
खूप खेळ ते खेळावे;
वाऱ्यावरतीं पोहावें!
मुलांस टुकटुक;
फुलांस टुकटुक;
जगास जें ना कधीं मिळे,
पाणी प्यावें ढगांतलें.

दिसेल का तेथुन त्याला
मामाच्या घरचा माळा?
दिसेल का तेथून पुढें
डोंगरमाथ्यापलीकडे?



आणिक तेथुन तूं आई,
दिसशिल कीं मजला नाहीं?
पतंग व्हावें;
उंच उडावें;
वाटे आकाशीं जावें!
आई : असें कधीं ना बोलावें!



# चिमुरडी

पोर चिमुरडी
चुफते नाड्या;
करिते खोड्या
गोड्या, गोड्या. ओठ इटुकले,
गुब्रे गाल,
नाकं-नक्टी
लाले लाल. पोरच का ही?
कीं स्वर्गींतिल
परीच आली
बघण्या भूतल? म्हणुन पाहतों
पुन्हां पुन्हां तर
पाय टेकते
का ही भूवर!



# गणपतिबाप्पा

गणपतिबाप्पा, गणपतिबाप्पा,
पुढच्या वर्षी येशिल का?
गणपतिबाप्पा, गणपतिबाप्पा,
एकविस मोदक खाशिल का?
गणपतिबाप्पा, गणपतिबाप्पा,
उंदरावरतीं बसशिल का?
गणपतिबाप्पा, गणपतिबाप्पा,
सोंडेखाली हसशिल का?
गणपतिबाप्पा मोरया,
पुढच्या वर्षी लौकर या;
गणपतिबाप्पा, गणपतिबाप्पा,
धोंद वाढलें किती पहा;
गणपतिबाप्पा, गणपतिबाप्पा,
जोरबैठका काढ दहा!



# येरे येरे पावसा

येरे येरे पावसा,
तुला देइन पैसा;
पैशाचा घे खाऊ;
दूर नको जाऊं.

येरे येरे पावसा,
देइन तुला आणा;
आणा नाहीं थोडा,
आण निळा घोडा.

येरे येरे पावसा,
फेक तुझा फांसा;
नको सांगूं दान!
देइन रुपया छान.

येरे येरे पावसा,
डोंगर तुझा मावसा.
टाक सगळें नाणें;
फुकट नाहीं गाणें!

# पिशी मावशी

मसणवटीच्या वाटेवरतीं
वाट थबकते एक ठिकाणीं!
आणि पाहतां भंवतीं दिसती
...फक्त चौथरे...नष्ट घराणीं.

उमगतील मग पडक्या भिंती,
जिवंत पारंबीचा धारण;
फक्त सात बेलाचे वासे;
—मला न ठाउक त्याचें कारण.

पिशी मावशी तेथें वसते;
गांव राहतो धरून डोंगर!
...एकलकोंडी...कुशींत घेते
लुकलुकणारें काळें मांजर.

सात दिसांनीं फक्त एकदां
सर्वांगाला लावुन रक्षा,
पिशी मावशी कोरण मागे;
चवताळे जर म्हणाल 'भिक्षा'

"पिशी मावशी...पिशी मावशी"
म्हणतीं पोरें; म्हणतों मीही;
ती दिसतां पण खचते हिंमत
—अन् आठवतें दुसरें कांहीं!





## विंदा करंदीकर यांच्या बालकविता संचातील पुस्तके

राणीची बाग
सशाचे कान
एकदा काय झाले!
परी ग परी
एटू लोकांचा देश
सर्कसवाला
टॉप
सात एके सात
बागुलबोवा
पिशी मावशी आणि तिची भुतावळ
अडम् तडम् (परचुरे प्रकाशन)